# प्रकरण - तिसरे

---

# हमीद दलवाई यांचे राजकीय व सामाजिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार

# प्रकरण - तिसरे

# हमीद दलवाई यांचे राजकीय व सामाजिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार

राजकीय आणि सामाजिक प्रबोधनात हमीद दलवाई यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. विशेषत: मुस्लिम समाजाने धर्माकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन सोडून द्यावा आणि धर्माकडे वैज्ञानिक दृष्टीकोनाने पहावे असे हमीद दलवाईंचे मत होते. हमीद दलवाई स्त्री स्वातंत्र्याचे समर्थक होते. मुस्लिम समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधी त्यांनी आवाज उठवला. वाढत्या जमातवादाला आणि जातीय दंगलीना जबाबदार हिंदू-मुस्लिम मुलतत्त्ववाद आणि प्रतिगामी राज्यकर्ता वर्ग आहे असे त्यांना वाटे. हमीद दलवाई यांना इस्लामविषयी आदर होता. ते म्हणतात "भारतातील मुस्लिम संस्कृतीने मला घडविले आहे. ह्या संस्कृतिने ज्या चांगल्या गोष्टी निर्माण केल्या आहेत त्यांचा मला अभिमान आहे आणि ज्या विद्रुप गोष्टी तीत आहेत त्या बदलल्या पाहिजेत."[१] अर्थात हमीद दलवाई यांना मुस्लिम समाजामध्ये ज्या अंधश्रद्धा, कालबाह्य प्रथा-परंपरा होत्या ज्या बदलत्या काळानुसार बदलाव्या लागतात अशा कालबाह्य गोष्टी बदलावयाच्या होत्या. त्यासाठी त्यांना इस्लामच्या चिकित्सेची गरज वाटत होती. हमीद दलवाई यांनी विविध ग्रंथ, लेख, व्याख्याने कथा-कथनांच्या माध्यमाने आपले विचार मांडले. त्यांनी आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविण्यासाठी काही पुरोगामी लोकांच्या मदतीने 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाची' स्थापना केली. मंडळाच्या कार्याचा आढावा मागील प्रकरणात घेतलेला आहे.

हमीद दलवाई यांच्या राजकीय, सामाजिक तसेच धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यामूळे त्यांच्या या विचारांना जाणून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी काही घटकांचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत प्रकरणामध्ये हमीद दलवाई यांनी भारतीय मुस्लिम राजकारणाबद्दल केलेली चिकित्सा, भारत-पाकिस्तानच्या फाळणीची

केलेली कारणमिमांसा फाळणीमध्ये मुस्लिम जातीवाद्यांनी बजावलेल्या भूमिकेबद्दल त्यांचा दृष्टीकोन, तसेच दलवाईंच्या दृष्टीने फाळणीचे गुन्हेगार कोण होते? फाळणीच्या अनिवार्यतेबद्दल त्यांचे मत त्याचबरोबर स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुस्लिम राजकारणाचा त्यांच्या दृष्टीकोनातून परामर्श घेवून स्वातंत्र्यानंतर मुस्लिम समाजाने निर्माण केलेल्या प्रश्नांची चर्चा केली आहे. तसेच दलवाई यांनी त्यांच्या दृष्टीकोनातून संघपरिवाराची केलेली चिकित्सा हिंदू राष्ट्रवादाबद्दलचा त्यांचा दृष्टीकोन, आणि त्यांच्या राजकीय सामाजिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाबद्दलच्या विचारांचा वस्तुनिष्ठ आढावा घेतला आहे.

**हमीद दलवाई यांनी भारतीय मुस्लिम राजकारणाबद्दल केलेली चिकित्सा :**

हमीद दलवाई यांनी भारतीय मुस्लिम राजकारणाची प्रदिर्घ चिकित्सा केली. त्यांच्या भारतीय मुस्लिम राजकारणाबद्दलच्या दृष्टीकोनास जाणून घेण्यासाठी भारतामध्ये इस्लामचा प्रसार किंवा आगमन कसे झाले. याबद्दलची दलवाई यांनी केलेल्या कारणमिमांसेचा आढावा घ्यावा लागेल. दलवाईंच्या मते "भारतातील इस्लामचे आगमन येथे शांततापूर्ण मार्गाने झालेले नाही. ते हिंसक पद्धतीने झाले. शिवाय मुसलमान उपखंडात सर्वसाधारणपणे अल्पसंख्यांक राहिले आहेत."[२] "प्रेषित महंमदाच्या काळापासून राज्य आणि धर्म यांची सांगड घातलेली दिसते. महंमद पैगंबर केवळ इस्लाम धर्मसंस्थापक नव्हते तर ते राज्यसंस्थापकही होते. महंमदानी केवळ धर्मप्रसार केला नाही तर राज्य स्थापन केले."[३] त्यामुळे इस्लामच्या चळवळीत सत्तासंपादनाची दिशा मिळाली. धर्मप्रसाबरोबर राज्यविस्तार झाला नाही, तर राज्यविस्ताराबरोबर धर्मप्रसार झाला. अर्थात इस्लामी राज्यकर्त्यांनी धर्मप्रसार बळाच्या जोरावर केला असे दलवाई यांना म्हणावयाचे आहे. परंतु इस्लामच्या प्रसारामागे केवळ बलप्रयोग हा घटक कारणीभूत नाही. तर, अन्य घटक ही कारणीभूत मानले जातात. उदा. "राजाणूग्रह बक्षिसे मिळावे, सामाजिक मानमर्तबा मिळावा, म्हणून काही भारतीय

लोकांनी इस्लामचा स्वीकार केला. दुसरी गोष्ट इस्लामची शिकवण चांगली आहे या खात्रीतून आणि तिसरी गोष्ट म्हणजे उच्च वर्णीयांच्या शोषणाला आणि वर्णव्यवस्थेला कंटाळलेल्या भारतातील दलीत वर्गाने इस्लाम स्वीकारला.''[४] भारतामध्ये इस्लामच्या प्रसारामागे हे तीन मतप्रवाह आहेत. परंतु आणखी एक मतप्रवाह आहे तो म्हणजे "ब्राह्मणी वर्चस्व कर्मकांड आणि चार्तुवर्णीयांची अत्याचारी हुकुमशाही यातुन सुटका करून घेण्याची धडपड भारतीय लोकसमुहात चालली होती. हिंदू साधू संतानी मोक्षाचा, मुक्तीचा संदेश दिला. तरी चार्तुवर्ण, अस्पृश्यता, जाती-जमातींचे कर्मकांड त्यांना नष्ठ करता आले नाहीत. संत चोखोबा सारख्या संतानी आपली असाह्यता व्यक्त केली. आणि बहुसंख्य संतानी ही समाजरचना ईश्वर निर्मित म्हणून स्विकारली. अशा विशिष्ठ परिस्थितीत सुफी संतानी समतेचा, बंधुत्वाचा आणि मानवतेचा संदेश घेवून आपले कार्य सुरू केले. परिणामी अस्पृश्यता आणि चार्तुवर्ण यांच्या अत्याचारातून सुटण्याचा मुक्तीचा मार्ग या जमातीना दिसला. परिणामी सुफींच्या प्रभावाखाली शुद्र आणि अतिशुद्र तसेच भटक्या आणि बलुतेदारी चौकटीतील जाती-जमातीच्या लोकांनी इस्लामचा स्विकार केला.''[५] दलवाई म्हणतात तसे इस्लामी राज्यकर्त्यांनी धर्मप्रसार केला नाही असे नाही. औरंगजेबाने धर्माच्या बाबात बलप्रयोग केला. किंबहुना औरंगजेब संपूर्ण भारत इस्लाममय करण्याची इच्छा बाळगून होता. तसे प्रयत्न त्याने अखेरपर्यंत केल्याचे इतिहासात अनेक दाखले दिसतात. दलवाईंची भारतातील इस्लामच्या प्रसाराबद्दल भूमिका बरोबर असली तरी ती एकांगी वाटते कारण इस्लामच्या प्रसाराबद्दल उपरोक्त घटकांचा विचार केला असता, भारतातील इस्लामच्या प्रसाराबद्दल हिंसक मार्ग अवलंबला गेला असे दलवाई यांनी म्हटले ते विसंगत व एकांगी आहे. इस्लामच्या प्रसारात बलप्रयोग व हिंसक मार्गापेक्षा वरील घटक अतिशय महत्त्वाचे आहेत म्हणून भारतामध्ये इस्लामच्या प्रसाराबद्दल विचार करताना या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हमीद दलवाई यांनी या घटकांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

"आठव्या शतकात मुसलमान भारतात आले. इ.स. ७११ मध्ये महंमदबीन कासिमने सिंध प्रांतावर स्वारी केली."[६] हमीद दलवाई यांनी महंमदबीन कासिमपासून जवळ जवळ भारताच्या स्वातंत्र्यापर्यंतच्या अनेक घटनाक्रमाची चिकित्सा केलेली आहे. भारतातील स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये मुस्लिम राजकारणाची चिकित्सा करताना दलवाई यांनी मुस्लिमांच्या धार्मिक चळवळीचा उदय, पाकिस्तान चळवळ आणि सुशिक्षित मुस्लिमांची भूमिका आणि त्यांनी उभा केलेली आंदोलने, आणि पाकिस्तानची निर्मिती अर्थात फाळणी पर्यंतच्या घटनाक्रमांची चिकित्सा केलेली आहे.

**मुस्लिमांच्या धार्मिक चळवळीचा उदय :**

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीपासून मुसलमानांची भारतातील सत्तेची आठशे वर्षांची परंपरा होती. ब्रिटिशांच्या आगमनाने मुसलमानांची सत्ता ब्रिटिशांनी घेतली आणि भारतातील मुसलमानी अंमल संपुष्टात येवून आठशे वर्षाच्या प्रदिर्घ सत्ता परंपरेला खंड पडला. "ब्रिटिशांनी सत्ता हिरावून घेतली यामुळे भारतातील धर्मांध मंडळीना इस्लाम प्रसारातील हीच प्रमूख अडचण होवून बसली. ब्रिटिशांपूर्वी आपण भारतामध्ये राज्यकर्ते होतो. ब्रिटिशांनी सत्ता हिसकावून घेतली. धर्मप्रसाराची परंपरा खंडीत झाली. या विशिष्ट जाणीवेतून मुस्लिमांच्या धार्मिक चळवळींनी जन्म घेतला."[७]

हमीद दलवाई यांच्या मते शाह वलिऊल्ला मुस्लिमांच्या पुनरूत्थानवादी चळवळीत महत्त्वाचे आहेत. १७६५ मध्ये शाह वलिऊल्लाने प्रथमच धर्माच्या पायावर मुसलमानांना संघटीत होण्याचे आवाहन केले. सिरहिंदी आणि वलिऊल्ला इत्यादी धार्मिक नेत्यांनी इस्लामच्या प्रसारासाठी सत्तेच्या वापराची हाक दिली. १८०५ मध्ये ब्रिटिशांनी मोगलांचा पराभव केल्याने शाह वलिऊल्ला चा पुत्र शाह अब्दुल अझिज याने भारत हा दारूल हरब झालेला आहे असा फतवा काढला. भारताला पुन्हा एकदा दारेसलाम बनविण्यासाठी पुनरूत्थानवादी चळवळ सुरू झाल्या, "१८५७ च्या बंडामध्ये मुसलमानांनी प्रचंड भाग घेतला त्याची प्रेरणा धर्मनिष्ठ होती"[८] असे हमीद दलवाई

म्हणतात. १८५७ च्या उठावाला पाठींबा व प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या मुस्लिमांना त्यांनी धर्मनिष्ठ म्हटले ही त्यांची भूमिका एकांगी होती. १८५७ च्या उठावात भाग घेणारे मुसलमान हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून लढले. हिंदू-मुस्लिम भारताच्या ऐक्याची आणि भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या मार्गातील ही नांदी होती. १८५७ मध्ये ब्रिटिशांना हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचा अनुभव आला म्हणूनच १८५७ नंतर ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा ही निती अवलंबली. १८५७ च्या उठावामध्ये मुसलमानांचा सहभाग हा राष्ट्रप्रेमातून आणि स्वातंत्र्याच्या अभिलाषेपोटी होता. १८५७ च्या उठावला ब्रिटिशांनी चिरडून काढले. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या वारसदारांना गोळ्या घातल्या. संपूर्ण सत्ता ब्रिटिशांनी आपल्या हातामध्ये घेतली.

हमीद दलवाई मुसलमानांच्या पुनरूत्थानवादी चळवळीच्या उदयाची कारणमिमांसा करताना आणखी एक गोष्ट नमुद करतात ती म्हणजे मुस्लिम धार्मिक सनातनी लोकांनी मुसलमानांची भारतातील सत्ता ब्रिटिशांच्या हातात जाण्यास व मुसलमानांच्या सत्तेचा अस्त होण्याबद्दल धार्मिक नेत्यांनी केलेली कारणमिमांसा मुस्लिम धार्मिक नेते असे म्हणतात की.

१) भारतीय मुसलमान इस्लामचे शुद्ध स्वरूपात आचरण करीत नसल्यामुळे त्यांची अवनती झाली.

२) इस्लामची आदर्श समाजव्यवस्था प्रेषित महंमद आणि त्यानंतरचे चार खलीफा यांच्या काळातच होती.

३) पैगंबरकालीन आदर्श, या समाजाने सोडून दिल्याने या समाजाची अवनती झाली.

इत्यादी कारणे सांगून त्यावर उपाय म्हणून वरील दोष दूर करून ते आदर्श बाळगल्यास या दास्यमुक्तीतून बाहेर पडण्याचे सामर्थ्य मुस्लिम समाजाला लाभू शकते. मुस्लिम धार्मिक नेत्यांची ही भूमिका पुनरूत्थानवादी होती. अरबस्तानात देखील अशाच प्रकारच्या पुनरूत्थानवादी, मुलतत्ववादी वहाबी चळवळ सुरू झाल्याचे दिसते.

**वहाबी आंदोलन :**

वहाबी आंदोलनास हमीद दलवाई मूलभूतवादी चळवळ / पुनरूत्थानवादी चळवळ मानतात. वहाबी आंदेलन प्रथम अरबस्तानमध्ये अब्दुल वहाब यांनी सुरू केले. अरबस्तानातील वहाबी आंदोलन प्रतिगामी होते.

"अरबस्तानात सुरू झालेले हे आंदोलन पुढे वहाबी चळवळ म्हणून संबोधण्यात येऊ लागले. अरबस्तानातील चळवळीचा रोख दर्गे आणि पीरांची पूजा करणे यांच्याविरूद्ध होता. भारतातील धार्मिक नेत्यांनाही दर्ग्यांची पूजा नापसंत होती, परंतु त्याहूनदेखील येथील विशिष्ठ राजकीय आणि ऐतिहासिक परिस्थितीमुळे येथील मूलभूतवादी चळवळींची हिंदूविरोधी वृत्ती जोपासण्यावर त्यांचा भर होता. अरबस्तानात बिगर मुसलमानच नसल्यामुळे त्या चळवळीचे स्वरूप समाजांतर्गत राहिले. येथे ते समाजांतर्गत होतेच परंतू येथील राज्यसत्ता आणि बहुसंख्यांक हिंदू समाज ह्यांच्या विरोधी पवित्रा ह्या चळवळीने घेतला होता."[१०] अर्थात दलवाईंच्या मते भारतातील वहाबी चळवळ हिंदू विरोधी होती. याबद्दल मतभेद उत्पन्न होवू शकतात. कारण भारतामध्ये कॉर्नवालीच्या कायमधारा पद्धतीमुळे भारतातील पूर्वीच्या समाजरचनेवर विपरित परिणाम झाला. या बदलत्या परिस्थितीमध्ये बंगालसारख्या प्रदेशातील मुस्लिम जमीनदारांचा जो नवा वर्ग निर्माण झाला. त्या वर्गास या बदलाला एकरूप होने शक्य झाले नाही. त्यामुळे मूळ प्रेरणा जरी अरबस्तानातील अब्दुल वहाबच्या चळवळीची असली तरी, भारतामध्ये तिचे स्वरूप उलट होते कारण भारतातील वहाबी चळवळ आर्थिक व सामाजिक संरचनेमध्ये झालेल्या बदलाच्या असंतोषाने निर्माण झाली. ती हिंदूविरोधी उभी राहिली नाही तर १९व्या शतकात ब्रिटिशांविरूद्ध उभी राहीलेली पहिली सशस्त्र चळवळ होती.

"भारत हा दारूल हरब बनलेला आहे. म्हणून ब्रिटिशांविरूद्ध उठाव केला पाहिजे अशा भावनेतून भारतात वहाबी आंदोलन सुरू झाले."[११] दलवाईंच्या मते १८५७

नंतर मुस्लिम आपला पहिला आणि महत्त्वाचा शत्रू ब्रिटिश आहे या भावनेतून मुस्लिम मने कमालीची ब्रिटिशविरोधी बनली. धार्मिक नेत्यांनी ब्रिटिशांच्या सर्वच धोरणांचा आणि सुधारणांचाही विरोध सुरू केला. देवबंदच्या परंपरागत उलेमानी सर सय्यद अहमद व अलीगढ विद्यापीठाला या मानसिकतेतूनच विरोध केला.

सर सय्यद यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम समाज सुधारणेचा अल्पसा प्रयत्न केला. ते उत्तर भारतातील अभिजन मुस्लिमांचे नेते होते. सुरूवातीची त्यांची भूमिका जरी हिंदू-मुस्लिम ऐक्याची असली तरी ब्रिटिशांच्या भेदनितीला ते बळी पडले व त्यांची भूमिका बदलत गेली.

**सर सय्यद अहमद यांची भूमिका :**

"सर सय्यद अहमद यांनी इंग्रजी शिक्षणाचा आग्रह धरला. सर सय्यद अहमद यांच्या मते मुस्लिम समाज परावलंबी बनलेला आहे. हे परावलंबन दूर होणे आवश्यक आहे. शिक्षणाअभावी दिवसेनदिवस हा समाज अवनत होत आहे. सरकारी शाळा-कॉलेजांचा फायदा घेण्यापासून तो वंचित राहत आहे."[१२] अशा पद्धतीने मुस्लिम समाजाचे मागासलेपण रेखाटत सुधारणेसाठी शिक्षणाचा आग्रह सर सय्यद अहमद यांनी धरला.

"सर सय्यद अहमद यांनी मुस्लिम स्त्रीबद्दल गोषा पद्धतीचा त्याग करावा, पाश्चात्य संस्कृतिबद्दल त्यांनी तिरस्कार बाळगू नये, इंग्रजीपासून फारकत घेवू नये अशी भूमिका घेतली. कुराणाचा अर्थ बुद्धीच्या आधारेच लावला पाहिजे अशी सर सय्यद यांची भूमिका होती असे मत हुसेन जमादार यांचे आहे."[१३] फातमा ए. एस. यांच्या मते सर सय्यद अहमद सक्षम अशी सामाजिक चळवळ उभी करण्यात अपयशी ठरले. त्यांनी मुस्लिम स्त्रीयांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. त्यांनी मुस्लिम स्त्रीयांसाठी शाळा आणि महाविद्यालये काढली नाहीत. तसेच उलेमांच्या हुकुमशाहीला प्रभावी उत्तर दिले नाही तसेच, कठोर धर्मचिकित्सा करण्याचे त्यांनी टाळले. त्यांची चळवळ केवळ राजकीय चळवळ होती."[१४]

आचार्य जावडेकर आपल्या हिंदू मुस्लिम ऐक्य या ग्रंथामध्ये म्हणतात की, सर सय्यद अहमद हे हिंदू मुसलमानांचे पहिले पुढारी होते. त्यांनी १८८४ साली गुरूदासपूर येथे केलेल्या भाषणांत हिंदूस्थानातील हिंदू व मुसलमान हे धर्माने भिन्न असले, तरी राष्ट्रदृष्टीने ते एकच आहेत, इतकेच नाही, तर हिंदुस्थानातील ख्रिस्ती हे सुद्धा राष्ट्रदृष्टीने हिंदी आहेत असे म्हटले. आ. जावडेकरांच्या मते १८८४ पर्यंत सर सय्यद अहमद हे एक राष्ट्र या कल्पनेचे समर्थक होते.''[१५] ''१८८४ पर्यंत सर सय्यद यांचे राजकारण हे त्यांचे स्वतःचे राजकारण होते. त्यावेळी त्यांची भूमिका अलगतावादाची नव्हती तर १८८४ नंतरचे त्यांचे राजकारण पूर्णपणे अलिगढ कॉलेजचे प्राचार्य थियोडोअर ब्रेग यांच्या ताब्यात गेले. प्राचार्य ब्रेग, मारिसन आणि आर्ची-बोल्ड या त्रिकूटांनी मिळून सर सय्यद यांच्यावर पूर्णपणे ताबा मिळविला त्याला व्हाईसरॉय यांचीही संमती होती. त्यामधूनच फोडा आणि राज्य करा हे ब्रिटिशांचे साम्राज्यवादाचे धोरण यशस्वी होत गेले.''[१६] १८५७ च्या उठावामधील हिंदू मुस्लिम ऐक्य ब्रिटिशांना दिसून आले. त्यामुळे पुढे ब्रिटिशांना भारतातील साम्राज्य टिकविण्यासाठी हिंदू-मुसलमानामध्ये फुट पाडणारी निती अवलंबावी लागली. सर सय्यद अहमद सारखे मुस्लिम नेत्यांवर या नितीच्या माध्यमाने ब्रिटिशांनी ताबा मिळविला.

१८८५ नंतर सर सय्यद अहमद राष्ट्र सभा ही हिंदूंची आहे. ते ७०% हिंदूचे संघटन आहे. २४% मुसलमानावर त्यांचे वर्चस्व राहिले. त्यामूळे मुसलमानानी त्याकडे फिरकू नये. ब्रिटिशांचे राज्य असणे मुस्लिमांच्या हिताचे आहे. मुस्लिमांनी त्याचा फायदा उचलावा अशी भूमिका सर सय्यद घेवू लागले. ''भाषा टक्केवारीची नसेल पण राष्ट्र (पृथक लोकसमूह) म्हणून हिंदू बरोबर समान दर्जा व स्थान मिळावे ही भूमिका सर सय्यद अहमद यांची होती.''[१७]

''सर सय्यद अहमद यांनी सुरू केलेल्या अलिगडच्या मुसलमानातील आधुनिकतेच्या प्रवाहातून पाकिस्तानच्या मुसलमानी राष्ट्रवादाचा उदय झाला. सर सय्यद

अहमद यांच्या उदयानंतर व त्यांनी घेतलेल्या ब्रिटिशधार्जिण्या भूमिकेमुळे ब्रिटिशांची मुसलमान समाजाबाबतची भूमिकाही बदलू लागली."[१८] "मुसलमान समाजाच्या आधुनिकतेचा आरंभ अलीगढ चळवळीने झाला. मुसलमानांचा मागासलेपणा हे अलीगडच्या आंदोलनाचे कारण होते. ते मुसलमानी आधुनिकतेचा आरंभ करणारेही होते."[१९]

सर सय्यद अहमद केवळ मुस्लिमामध्ये सुधारणा करित नव्हते तर त्यांना राष्ट्रवादाच्या प्रवाहापासून अलिप्त ठेवण्याचे कार्य करित होते. ते हिंदूना धार्मिक दृष्ट्या काफिर लेखत नव्हते. सर सय्यद अहमद यांच्या मते "मुसलमान जेते आणि हिंदू जित आहेत. धार्मिकदृष्ट्या ख्रिश्चन काफीर नाहीत. तसेच ख्रिश्चनांना ईश्वराचा धर्मग्रंथ प्राप्त झालेला आहे."[२०] अर्थात सर सय्यद अहमद ब्रिटिश धार्जिने होते. ब्रिटिशांकडून त्यांना मुस्लिम समाजाबद्दल दृष्टीकोन बदलावयाचा होता असे दिसते.

"अलिगढ कॉलेजातील विद्यार्थ्यांवर पारंपारिक इस्लामचा संस्कार सनातनी उलेमांच्या करवी केला जाईल. ही तडजोड सर सय्यद यांनी स्वीकारली. यात बौद्धिक अप्रमाणिकपणा होता असा आरोप करणे सर्वस्वी योग्य नाही. आधुनिक शिक्षण घेतलेली मुस्लिम नवशिक्षितांची पिढी तयार होण्याचा मार्ग खुंटू नये ही सर सय्यद अहमद यांची दृष्टी होती. त्यांचे मन मध्ययुगीन सरंजामदारी होते. असे म्हणणेही गैर आहे पण त्यांची मुख्य चिंता उत्तर भारतातील वरिष्ठ 'अश्रफ' मुसलमानांच्या भवितव्याची होती असे नक्कीच म्हणता येते. या वर्गाच्या पुनरूत्थानाचे ते मुख्य प्रवर्तक होते असे म्हणता येईल."[२१]

अर्थात सर सय्यद अहमद यांच्या मुस्लिम सुधारणावादी भूमिकेबद्दल दुमत निर्माण होत नाही परंतू सर सय्यद अहमद यांची हिंदू-मुस्लिम ऐक्याबद्दलची बदलती भूमिका हिंदू-मुस्लिम अलगतावादाची होती हे तितकेच सत्य आहे.

**पाकिस्तानची चळवळ आणि सुशिक्षित मुसलमानांचे आंदोलन :**

हमीद दलवाई यांच्या मते "सर सय्यद अहमद १८८७ ते जीना १९४६ हा भारतीय मुसलमान समाजातील सुधारणावादाचा टप्पा आहे. आणि त्या सुधारणावादाचे प्रवक्ते बहुसंख्यांक हिंदू समाजाला यादवीचे आव्हान देत असल्याचे दिसून येते. सर सय्यद अहमद मुसलमान सुशिक्षितांच्या आशा-आकांक्षांचे आरंभकर्ते आहेत. जीना त्याचे प्रतिक आहेत. सर सय्यद अहमदखान ज्या वेगळ्या राष्ट्रवादाचे प्रवक्ते बनले त्याचे जीना प्रतीक बनले. ही मुसलमान सुशिक्षित वर्गाच्या राष्ट्रीय प्रेरणांची ऐतिहासिक आणि स्वाभाविक परिणती होय."[२२] अलिगढ विद्यापीठातून शिकून बाहेर पडलेल्यांनी पुढे हिंदू-मुस्लिम अलगतावादाला चालना दिली. "अलिगढ पाकिस्तानच्या चळवळीचा पाया आहे आणि पाकिस्तानची निर्मिती हे अलिगड चळवळीचे अपयश आहे."[२३] "राष्ट्रीय जागृतीच्या प्रारंभीच्या काळात सुशिक्षित मुसलमानांच्या मनातील दोन प्रवाहांची कल्पना येते. बद्रुद्दिन तय्यबजी समान नागरिकत्वावर आधारलेल्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करतात. हिंदूशी सहकार्य करण्याचे प्रतिपादन करतात आणि सर सय्यद अहमदना या राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन मुसलमानांचे नेतृत्व करण्याचे आवाहन करतात, परंतु सुशिक्षित मुसलमान काँग्रेसकडे आकर्षित होत नाहीत. ते सर सय्यद अहमद यांनी सुचविलेल्या विभक्तवादाच्या मार्गाने वाटचाल करू लागतात."[२४]

१९०६ साली 'मुस्लिम लीगची' स्थापना झाली. दलवाई यांच्या मते "मुस्लिम लीगच्या स्थापनेनंतर नवाब बाकीरूल मुल्क यांनी अलिगढला विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात ब्रिटिश सत्ता भारतात राहणे मुसलमानांच्या हिताचे आहे असे उघड प्रतिपादन केले. मुस्लिम लीग केवळ मुसलमानांना संख्यावार प्रतिनिधित्व मानून थांबलेला नाही. सिमला येथे व्हाईसरॉयला १९०६ साली सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुसलमानांचे राजकीय स्थान ओळखून त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. शंभर वर्षापूर्वी त्यांचे जे स्थान होते त्याची या मागणीचा विचार करताना आठवण ठेवावी असेही त्यात म्हटले आहे."[२५] यावरून असे स्पष्ट होते की सत्तेच्या समान भागीदारीची अभिलाषा मुसलमान सुशिक्षितामध्ये तेव्हापासूनच होती.

सर सय्यद अहमद, बॅ. महमद अलीजीना, अगा खान, सय्यद हसन, बिलग्रामी 'Sprit of Islam' चे लेखक अमिर अलि, सर महंमद शफी इत्यादी अनेक मुसलमान सुशिक्षित मंडळी हिंदू-मुस्लिम अलगतावादाच्या चुकीच्या भूमिका मांडण्यात अग्रेसर होते. दलवाईंच्या मते "भारतीय मुसलमानांच्या मागण्या क्रमाक्रमाने वाढत गेल्या. मोर्ले-मिंटो सुधारणा, मॅंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, १९३५ चा फेडरल कायदा आणि १९४७ चे भारतीय विधेयक अशा क्रमाने सत्तांतर झालेले आह."[२६] दलवाईंचे हे मत रास्त वाटते कारण मुस्लिम लीगच्या मागण्या ह्या क्रमाक्रमाने वाढत जावून अंतिम पृथक मुस्लिम राष्ट्राची मागणीपर्यंत गेली हे तितकेच सत्य आहे.

**भारताची फाळणी : पाकिस्तानची निर्मिती :**

भारताची फाळणी घडून धार्मिक दूराभिमानातून पाकिस्तानच्या निर्मितीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. भारत पाकिस्तान फाळणी ही एका रात्रीत घडलेली घटना नाही. हिंदूस्थानच्या इतिहासातील अनेक घटनाक्रमांची ती शोकांतिक परिणती आहे. विल्यम हंटर यांनी 'Indian Musalmans' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाचा आधार घेवून अनेक सुशिक्षित मुसलमान आपल अनाठायी मागण्या दामटण्याचा प्रयत्न करीत. लॉर्ड डफरिन यांचा १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रसभेस पाठिंबा होता.

"मि. ह्यूम यांनी राष्ट्रसभेला चळवळ करणारी संस्था बनविण्यास प्रारंभ केला. आणि हिंदूस्थानातील अनेक वजनदार राष्ट्रीय पुढारी तिच्या चळवळीत सामील झाले. तेव्हा राष्ट्रसभेतून मुसलमान समाजाला फोडून काढण्याची व तिला केवळ हिंदूंची सभा ठरविऱ्याची भेदनीती लॉर्ड डफरिन आणि ब्रिटिश नोकरशाहीतील काही कपटपटु लोकांनी अवलंबिण्यास प्रारंभ केला. हिंदूस्थानात हिंदू-मुस्लिम अशी दोन राष्ट्रे नांदत आहेत ही कल्पना प्रथमत: लॉर्ड डफरिन यांच्या मेंदूतून निघालेली आहे."[२७] डफरिन यांनी हिंदू-मुस्लिम हे कसे वेगवेगळे आहेत याबद्दल रंगविलेल्या चित्राचा सविस्तर आढावा मागील प्रकरणात आलेला आहे. यामुळे हिंदू-मुस्लिम अलगतावाद वाढत गेला किंवा त्यामध्ये भर पडत गेली.

"१९१६ ला लखनौ करार झाला. त्यानंतर १९२० साली गांधीजींनी कायदेभंगाची चळवळ संघटित केली. परंतु मुसलमानांच्या मागण्या मान्य केल्यानंतर आम्ही ब्रिटिशांविरूद्ध लढायला तयार आहोत असे सांगणारे जीना लढाईच्या मैदानात कुठे उतरलेले दिसत नाहीत. जीना हिंदू-मुस्लिम प्रश्नांवर मतभेद होऊन काँग्रेसमधून बाहेर पडलेले नाहीत. त्यांचा गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीला विरोध होता. नागपूर काँग्रेसमध्ये १९२० साली सारीच काँग्रेस गांधीजींच्या मागे उभी राहिलेली आहे आणि आपण अल्पमतात आहोत हे दिसून आल्यामुळे काँग्रेस मधून बाहेर पडले."[२८] १९२० नंतर काँग्रेस मध्ये आणि राष्ट्रीय चळवळीत महात्मा गांधीजींचा प्रभाव वाढला, जीनांचे स्थान दुय्यम झाले. गांधीजींच्या आगमनामुळे जे पुढारी मागे पडले त्यापैकी जीना एक होते. त्यामूळे जीनांनी वेगळा मार्ग चोखाळला.

१९२० नंतर मोतीलाल नेहरू अहवालावरून मुस्लिम लीगमध्ये मतभेद झाले. आणि याच काळात महंमद शफी यांच्या अध्यक्षतेखाली वेगळी मुस्लिम लीग स्थापन झाली. जीना यांनी चौदा मागण्यांचा मसूदा केला. त्यामध्ये वेगळे मतदारसंघ रहावेत. कोणतेही विधेयक आपल्या धार्मिक हक्कांना बाधा आणीत आहे असे एखाद्या धार्मिक जमातीला वाटल्यास त्या जमातीच्या ७५% प्रतिनिधींच्या अनुमतीशिवाय ते पास होता कामा नये. केंद्र अथवा राज्य मंत्रीमंडळात ३३% मुस्लिम मंत्री असावेत. मुसलमानांना सर्व सरकारी क्षेत्रात पुरेशा जागा मिळाव्यात अशी घटनेतच तरतूद करावी."[२९] अशा मागण्या जीनांनी केल्या.

४ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटिश सरकारने जातीय निवाडा जाहीर केला. त्यान्वये "मुसलमानांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या. सिंध अलग केला गेला, बलुचिस्तान आणि सरहद्द असे आणखी दोन मुस्लिम बहुसंख्यांक प्रांत निर्माण झाले. मुसलमानांना वेगळा मतदार संघ दिला गेला. अल्पसंख्यांक असलेल्या प्रांतात त्यांना संख्येहून अधिक प्रतिनिधित्व देण्यात आले."[३०]

**१९३७ च्या निवडणूका :**

१९३५ च्या कायद्यान्वये प्रथमच राज्यांना मर्यादित अधिकार उपभोगता येणार होते. अशा परिस्थितीत १९३७ च्या निवडणूका पार पडल्या. "या निवडणूकीत मुस्लिम लीगला एकुण मुस्लिम मतापैकी ३,२१,७७२ (एकूण मुस्लिम मते ७३,१९,४४५) म्हणजे मतांची टक्केवारी ४.४% इतकी होती. जीना अपयशाने निराश बनले."[३१] १९३७ नंतर जीनांना आपले अस्तित्व टिकविणे भाग होते त्यासाठी जीना मुस्लिमांमध्ये चिथावणीची वाणी बोलू लागले. जीनांना मुस्लिमांच्या पाठिंबा मिळविण्यासाठी मुसलमानांच्या धार्मिक प्रेरणांना आवाहन करण्याचा मार्ग सोपा वाटला. मुस्लिमांना जातीवादी आवाहन करून आणि हिंदू वर्चस्वाची भिती दाखवून आपण मुस्लिमांचा पाठिंबा मिळवू शकतो याची जाणीव होताच जीनांनी तसे करण्यास सुरूवात केली. त्यात जीनांना कमालीचे यश मिळाले. ही एक शोकांतिका म्हणावी लागेल.

**भारत-पाकिस्तान फाळणीमध्ये मुस्लिम जमातवाद्यांनी बजावलेली भूमिका आणि फाळणीचे गुन्हेगार :**

सर सय्यद अहमदपासून जीनापर्यंत जे जे जमातवादी मुस्लिम नेते होते. त्या सर्वांनी वेगळ्या राष्ट्राची भूमिका घेतल्याची दिसते. १९४० साली मुस्लिम बहुसंख्यांक प्रांताचे वेगळे राष्ट्र व्हावे असा ठराव मुस्लिम लीगने घेतला तेव्हापासून जीनांची समान भागीदारीची मागणी त्याच बरोबर मुस्लिम अंजूमनचे अध्यक्ष सरदार गुलाखान यांची अलगतावादी भूमिकेवरून चौधरी रहिमतअली यांनी प्रचारात आणलेला 'पाकिस्तान' हा शब्दप्रयोग या सर्व घटकांचा उहापोह पहिल्या प्रकरणामध्ये आलेला आहे.

"जीना राष्ट्रसभेवर टीका करू लागले, जीना आपल्या भावी मागण्यांच्या डावपेचांचा भाग म्हणून त्यांनी असत्य भडक प्रचार हे आपले हत्यार बनविले. हिंदू आणि मुसलमानांत काहीच समान नाही असे ते सांगू लागले. आमची भाषा वेगळी आहे, संस्कृती वेगळी आहे, वीर पुरूष वेगळे आहेत, इतिहास वेगळा आहे, आम्ही

(मुसलमान) सर्व दृष्टीने वेगळे आहोत असे ते सांगू लागले. १९३९ साली काँग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामा दिला. तेव्हा त्यांनी मुसलमानांना 'मुक्तिदिन' पाळण्याचे आवाहन केले. त्यांना विरोध करणाऱ्या मुसलमानांना ते इस्लामचे शत्रू संबोधू लागले."[३१] "मुस्लिम लीगचे इतर नेते हिंदू वर्चस्वाची भीती दाखवीत राहिले याचे कारण त्याखेरीज मुस्लिम जनमत त्यांना आपल्या पाठीशी संघटित करणे शक्य नव्हते. जीनांना ५०% सत्ता हवी होती. अखंड भारतात पन्नास टक्के सत्ता मिळत असेल तर त्यांना वेगळे पाकिस्तान नको होते. कारण अखंड भातातील ५०% भागीदारी वेगळे पाकिस्तान मिळण्यापेक्षा अधिक फायद्याची होती. ५०% सत्ता मिळत नसेल तर वेगळ्या पाकिस्तानची त्यांची मागणी होती. आणि ह्या पाकिस्तानचा आकार शक्य तितका मोठा असावा अशी जीनांची आकांक्षा होती."[३२] दरम्यान ब्रिटिश सरकारने सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविले. त्यांनी एक योजना सुचविली त्या मध्ये प्रांताना फुटून निघण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले याचा अर्थ हे स्वातंत्र्य म्हणजे पाकिस्तान निर्मितीला ब्रिटिश सरकारकडून मिळालेली तत्वत: मान्यताच होती.

"ब्रिटिश सरकारने १९४६ मध्ये तीन सदस्यांचे शिष्ठमंडळ पाठविले, या शिष्ठमंडळाने मुस्लिम लीग आणि काँग्रेस या दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांबरोबर संयुक्त बैठक घेऊन दुबळे केंद्र सरकार असलेल्या भारतीय संघराज्याची योजना मांडली. देशाचे विभाजन टाळण्याचा उद्देश यामध्ये होता. या योजनेत भारताचे तीन गट करण्यात आले होते. एका गटात पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्तान ही मुस्लिम बहुसंख्यांक राज्ये एकत्र आणण्यात आली होती. या गटातील मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण सुमारे ८०% होत होते. दुसरा गट आसाम, आणि बंगाल या राज्यांचा बनविला होता त्यामध्ये ५०% मुस्लिम लोकसंख्या होती. तिसरा गट इतर सर्व राज्यांचा मिळून बनविलेला होता, त्यामध्ये हिंदुंचे प्रमाण ८५% इतके होते. असे भारतीय संघराज्य होणार होते. ज्यामध्ये संघराज्याला केवळ परराष्ट्र संरक्षण आणि

दळणवळण इतकेच अधिकार होते. दहा वर्षांनी यातील कोणत्याही गटाला फुटून निघण्याचा अधिकार होता.''[३३] काँग्रेसने व जीना व मुस्लिम लीगने ही योजना मान्य केली. ही योजना अंमलात आली नाही. अर्थात ही योजना अंमलात आली असती तर पाकिस्तानचा आजचा जो आकार आहे त्यापेक्षाही मोठा दिसला असता. आणि आज जो भारत आकाराला आलेला आहे असा एकसंध भारत आकाराला आलाच नसता. काँग्रेसने या योजनेला स्वीकारण्यास नकार दिला. १९४६ मध्ये मुस्लिम कौन्सिलच्या बैठकीत ही योजना स्वीकारण्याच्या जीनांच्या भूमिकेचा अनेक मुस्लिम लीग सदस्यांनी विरोध केला. काँग्रेसने ही योजना मान्य करण्यास लावलेली दिरंघाई या कारणाबरोबरच अनेक मुस्लिम सदस्यांना सार्वभौम पाकिस्तान हवे होते. १० वर्षानंतर पाकिस्तान मिळविण्याच्या मानसिकतेमध्ये ही मंडळी नव्हती असे दिसते. म्हणून शेवटी ही योजना अमान्य केली.

१६ ऑगस्ट १९४६ साली 'प्रत्यक्ष कृतिदिन' मुस्लिम लीगने पाळण्याचे ठरविले. प्रत्यक्ष कृतिदिन हिंदूस्थानच्या इतिहासातील काळे पान ठरले. दलवाई यांच्या मते बंगाल लीगचे मुख्यमंत्री श्री. सुऱ्हावर्दी यांनी गुंडाना हाताशी धरले. आणि दंगलीची सरकाररित्या सिद्धता केली. मुस्लिम लीगचे मंत्री गुलामअली कालपूर व पीर इलाहीबक्ष यांनी हिंदूना धमक्या देणारी वक्तव्ये केली. सकाळी लवकरच कलकत्यामध्ये दंगली सुरू झाल्या. दुपारनंतर शिख संघटित झाले. त्यांनी मुस्लिमांचा प्रतिप्रहार करायला सुरूवात केली. दुसऱ्या दिवशी हिंदूंनी मुसलमानावर आक्रमण करण्यास सुरू केले. या सर्व दंगलीची प्रतिक्रिया म्हणून बिहारमध्ये हिंदू-मुस्लिम दंगली सुरू झाल्या. त्यापाठोपाठ नौआखली आणि रिधेरा भागात दंगली उसळल्या. बिहारच्या दंगलीनंतर लीगने फाळणीची ठाम भूमिका घेतली. शेवटी ३ जून १९४७ रोजी फाळणीची योजना घेवून लॉर्ड माऊंटबॅटन हिंदूस्थानमध्ये आले. त्यानंतर झालेल्या अनेक राजकीय स्थित्यंतराने भारताची फाळणी झाली.

हमीद दलवाई यांनी फाळणीबद्दल केलेली मांडणी काही गोष्टी योग्य आहेत. परंतू फाळणीला केवळ मुस्लिम जमातवादच कारणीभूत होता. एकूण असा त्यांचा सूर आहे. क्रियेला प्रतिक्रिया निर्माण होत असते हा नियम थोडा त्यांनी बाजूला ठेवला. फाळणीला त्यांनी ब्रिटिशांना थोडाफार दोष दिला. परंतु साम्राज्यकर्त्यांना अशा भेदनितीचा अवलंब करावाच लागतो असे ते म्हणतात. याचा अर्थ ब्रिटिशांनी भेद निती अवलंबलीच नसती तरी फाळणीच्या दिशेने समाजाने वाटचाल केलीच असती असे त्यांना म्हणावयाचे आहे. फाळणीबद्दल हमीद दलवाईंनी एक बाजू मुस्लिम जमातवाद्यांची मांडलेली आहे ती योग्य आहे. परंतू भारतातील सर्वच्या सर्व मुस्लिम जमातवादी होते असे नाही. राष्ट्रसभेत अनेक मुसलमान पुढारी स्वातंत्र्यासाठी झगडत होते. गांधीजींच्या खांद्याला खांदा लावून ही मंडळी लढत होती. त्यांची भूमिका राष्ट्रप्रेमाची होती. ते जमातवादी नव्हते. त्यामुळे फाळणीसाठी घडलेली दुसरी बाजू तपासणे आवश्यक आहे.

**फाळणी अपरिहार्य होती का? फाळणीची खरी कारणे :**

''हिंदू-मुस्लिम अशी दोन राष्ट्रे आहेत ती एकत्र राहू शकत नाहीत यातून द्विराष्ट्रवादाच्या संकल्पनेने जन्म घेतला. १८५७ नंतर मुसलमानांची सत्ता गेली. तेव्हापासून मुस्लिम अभिजनात अलगतावाद वाढला. सर सय्यद अहमद सारख्या मंडळींनी ब्रिटिश धार्जिनेपणाने लिखाण केले. विल्यम हंटर यांनी 'Indian Musalman's' ह्या पुस्तकात मुस्लिमांच्या मागासलेपणाचे विशिष्ठ असे चित्रण केले. १८८३ मध्ये जिल्हा स्तरावर स्वयंशासन देण्याच्या दृष्टीने निवडणूका घेण्याचा विचार ब्रिटिशांनी केला. सर सय्यद सारख्या धूरिनांनी मुसलमानात बहुसंख्यांक हिंदूंची भिती दाखवून देणार चुकीचा प्रचार केला. १८८५ मध्ये राष्ट्रसभेची स्थापना झाली. मुस्लिम जमातवाद्यांनी त्यास केवळ हिंदूंची सभा आहे असे सांगीतले. असा भ्रम निर्माण करण्यात ब्रिटिशांचा मोठा डाव होता. यातून विभक्त मतदार संघांची मागणी पुढे

आली. १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाली. महंमद इक्बालसाखे मुस्लिम अभिजन हिंदू-मुस्लिम एकत्र राहू शकत नाहीत अशी पुष्टी देवू लागले. पाकिस्तान या शब्दाचा प्रयोग केंब्रीज विद्यापीठातील रहमत अली नामक विद्यार्थ्याने प्रथम केला.''[३४]

मुस्लिम अलगतेला राजकीय वळण जीनांनी दिले "जीना हे खरे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. इस्लाम व त्या धर्माच्या जीवनपध्दतीशी जीनांचा संबंध नव्हता. ते पूर्णत: पाश्चिमात्य विचाराचे होते. नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंच्या नेमस्त विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. परंतु महात्मा गांधीजी यांचा प्रभाव काँग्रेसमध्ये जसा वाढत गेला तशा जीनांच्या महत्त्वकांक्षा साध्य होणे कठीण बनले त्यामुळे जीनांनी मुस्लिमांचा पाठिंबा मिळविण्यासाठी मुस्लिमांच्या धार्मिक प्रेरणांना चालना दिली. जीनांच्या मागण्या वाढत जावून सरते शेवटी 'पाकिस्तान' या सार्वभौम राष्ट्राच्या मागणीपर्यंत येवून ठेपल्या. आणि १९४० मध्ये पाकिस्तान या वेगळ्या राष्ट्राचा ठराव लीगने सहमत केला.''[३५]

महात्मा गांधीजी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आग्रही होते. त्यांची ती भूमिका रास्त होती. जीनांचीही सुरवातीची भूमिका तिच होती परंतु नंतर त्यांच्या महत्त्वकांक्षेने त्यांच्या विवेकनिष्ठेवर मात केल्याचे दिसते. सावरकरांनी हिंदुत्ववाद मांडला. हिंदू समाजातील अतिरेकी विचारांच्या लोकांनी इतिहासाचे चुकीचे विश्लेषण केले. भारतातील इतिहास मुस्लिम आक्रमणाचा आहे. त्यापूर्वीचा सुवर्णकाळ होता. अशा पद्धतीने इतिहासाचे उदात्तीकरण करून हिंदू-मुस्लिम मुळात कसे भिन्न आहेत याचे चित्र रेखाटले गेले. स्वा. सावरकरांच्या लिखानाची मांडणी तशीच हेती.

या सर्व प्रक्रियेमुळे हिंदूतील या मतप्रवाहाने मुस्लिम अलगतेच्या भावना बळावल्या. हिंदु-मुस्लिम समुदायात कमालीचा जातिय द्वेष वाढुन जी राजकीय उलथापालथ झाली. त्याची परिणती फाळणीत झाली. फाळणीच्या बाबतीत गांधीजींना दोष देण्यात येतो तो मुळात चुकीचा आणि खोटा प्रचार आहे. कारण महात्मा गांधीजी

अखेरपर्यंत हिंदु-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते ते केवळ समर्थकच नव्हते तर त्यांनी फाळणी प्रसंगी जातीय दंगली मिटविण्यासाठी प्रत्यक्ष कृती करून जातीय दंगलींना आवर घातला. गांधीजींना फाळणीमुळे हिंदू-मुस्लिम प्रश्न निकालात निघेल असे त्यांना वाटत नव्हते आणि आज तेच खरे 'ठरले. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानची निर्मिती होवूनही हा प्रश्न मिटला नाही. तर अधिक बिकट बनला. त्यामुळे गांधीजींची भूमिका चुकीची होती अशी भूमिका मांडणे चुकीचे आहे. कारण गांधीजींना अहिंसेच्या मार्गाने अखंड भारताचे हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य अपेक्षित होते.

भारताची फाळणी झाली ही त्या काळच्या परिस्थितीनुसार योग्यच म्हणावे कारण जमातवादी दंग्यांची भीषणता व रोजचा निरपराध लोकांचा जाणारा बळी आणि अमानुष कत्तली कुठेतरी थांबणे गरजेचे होते. म्हणून नाईलाजाने का होईना काँग्रेस सारख्या पक्षातील राष्ट्रीय नेत्यांना हा निर्णय घेणे भाग पडले. म्हणून फाळणी होणे अपरिहार्य ठरले.

**स्वतंत्र भारतातील मुस्लिम राजकारण आणि त्याने निर्माण झालेले प्रश्न :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील मुस्लिम राजकारण आणि त्यामुळे झालेल्या उलथापालथीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. फाळणीने प्रश्न मिटले नाहीच तर ते दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचे बनत गेले. स्वतंत्र भारतातील मुस्लिम आणि त्याने निर्माण झालेल्या प्रश्नांना जाणून घेण्यासाठी काँग्रेसने बजावलेली भूमिका, संघपरिवाराची जातीद्वेषाची भूमिका, तसेच मुस्लिम समाजासाठी तिसऱ्या धर्मसुधारणेची गरज आहे. मुस्लिम समाजामध्ये समाज सुधारणेच्या दृष्टीने १) शिक्षण प्रसार, स्त्रीयांचे अधिकार, विवेकनिष्ठ (बुद्धिनिष्ठता) धर्मचिकित्सा इत्यादी घटकांचा आधार घेवूनच स्वतंत्र भारतातील मुस्लिम प्रश्नांची चर्चा करावी लागेल.

१) <u>काँग्रेसची भूमिका</u> :

स्वतंत्रता चळवळीची दीर्घ परंपरा लाभलेल्या काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षाचे रूप धारणे केले. त्यामुळे काँग्रेस एखाद्या चळवळीसारखाच भारतीय जनसामान्यांना वाटला. त्यामुळे भारतीय समाजजीवनातून प्रबळ पाठिंबा काँग्रेसला स्वातंत्र्यानंतरही मिळाला. त्यामुळे हा पक्ष दिर्घकाळ सत्तेवर राहिला. काँग्रेसच्या स्वातंत्र्यपूर्व भूमिकेचा आढावा यापूर्वी आलेला आहे. म्हणून स्वतंत्र भारतामध्ये मुस्लिम राजकारण आणि त्यांनी निर्माण केलेल्या प्रश्नांच्या संदर्भात आपण काँग्रेसचा विचार करणार आहोत.

"समान नागरी कायद्याबाबत भारत सरकार मुस्लिमांचा जरूर अनुनय करते. एक तर काँग्रेस पक्षातील सर्वच माणसे सामाजिक अर्थाने पुरोगामी आहेत असे मानण्याचे कारण नाही. काँग्रेसमध्ये प्रचंड प्रमाणात सनातनवाद्यांचा भरणा आहे आणि सर्वधर्मियांना काँग्रेसमध्ये प्रवेश असल्यामुळे सर्वधर्मीय सनातन्यांचा तिच्यात भरणार झालेला आहे. या सनातन्यांनी हिंदु कोड बिलाला विरोध केलाच होता. आणि तेव्हांचे राष्ट्रपती कै. राजेंद्रप्रसाद हे या विरोध करणाऱ्या पक्षाचे नेते होते."[३६] यावरून दलवाई यांना असे सुचित करावयाचे आहे की मुस्लिम स्त्रीयांना हक्क देणारा समान नागरी कायदा आजतागायत करण्याचे धाडस कोणत्या राजकिय पक्षाने केलेला नाही. उलट काँग्रेस ने मुस्लिम समाजातील कालबाह्य परंपरांना चुचकारण्याचेच राजकारण केलेले आहे. मुस्लिम समाजातून आमच्या धर्माने हस्तक्षेप होतो आहे अशा प्रकारचा अनाठायी युक्तीवाद वारंवार होतो. धर्मामध्ये राज्यसंस्थेचा हस्तक्षेप होवू नये मात्र धर्माच्या नावाखाली चालू असणाऱ्या कालबाह्य प्रथा संबंधीत धार्मिक समुदायाच्या विकासाच्या आणि आधुनिकतेच्या आड येत असतील तर त्यामध्ये राज्यसंस्थेने हस्तक्षेप करून त्या बदलाव्या परंतु गेली कित्येक वर्षे काँग्रेसने जेव्हा-जेव्हा सत्ता मिळविली तेव्हा तेव्हा मतांच्या राजकारणासाठी या प्रथांना साधा हातही लावलेला नाही. यावरून या

तथाकथित पुरोगामी पक्षाचे प्रतिगामी रूपाचे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. मुस्लिम समाजाबद्दल आणखी एक प्रतिगामी निर्णय राजीव गांधी सरकारने शहाबानु प्रश्नी मुस्लिम स्त्रीला पोटगीचा हक्क नाकारणारा कायदा केला यावरून दिसतो.

"मुस्लिम समाजाचे दुर्दैव असे की स्वत:ला सेक्युलर समजणारे पक्ष, विशेषत: काँग्रेसने गेल्या पन्नास वर्षात मुस्लिम समाजाचे खऱ्या अर्थाने कल्याण होईल वा त्याची प्रगती होईल असे काहीही केले नाही. उलट त्यांच्या मतांसाठी त्यांच्या कालबाह्य रूढी, परंपरा यांना चुचकारण्याचेच प्रयत्न केले. त्यामुळे बहुसंख्यांक मुस्लिम समाज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेलाच राहिला. उलट हा मुसलमानांच्या अनुनयाचा प्रयत्न आहे, असे सतत सांगून भाजप आणि संघ परिवाराने मुस्लिम विरोधाची भावना हिंदू जनमानसात केवळ रूजवली नाही, तर सतत वाढती ठेवली आहे."[३७]

काँग्रेसने मुसलमानांच्या मुलभूत प्रश्नांकडे सतत दुर्लक्ष केलेले आहे. मुस्लिम समाजातील निरक्षरता, आर्थिक कमजोरपणा, आरोग्य, बेकारी असे अनेक प्रश्न त्यातून निर्माण झालेले आहेत. विभिन्न शासकीय नोकऱ्या व शैक्षणक संस्थांतील मुस्लिमांची टक्केवारी पाहिली तर अल्पशीच आहे. यासर्व प्रश्नांना एकटा काँग्रेस पक्ष जबाबदार नाही तर मुस्लिम समाजही बऱ्याच अंशी जबाबदार आहे. मुळात भारतीय मुस्लिम समाजातील कमालीचे दारिद्र्य आणि आर्थिक विपन्न अवस्थेमुळे हा समाज धार्मिक सनातनी मंडळींच्या आधिन जातो. या समाजास आधुनिक शिक्षण देवूनच हा समाज योग्य दिशेने विकासाच्या प्रवाहात सामिल होईल.

काँग्रेसने मुस्लिमांच्या एक गठ्ठा मतासाठी नेहमी मुस्लिमांच्या भावना न दुखविता ही मते मिळविण्याचे सौदेबाजीचे राजकारण केले. त्यास काही मंडळी मुस्लिम अनुनय असा चमत्कारिक अर्थ लावतात. मुळात गेली ५० ते ६० वर्षे काँग्रेस काय पण बाकी इतरही पक्षांनी मुस्लिमांचे कल्याण होईल असे काही केलेले दिसत नाही ही टीका होते ती खरीच आहे. कारण मुस्लिम अनुनय करून मुस्लिम समुदायाच्या पदरात झुकते

माप कोणी टाकल्याचे दिसत नाही अन्यथा इतका मागासलेपणा (सर्वच बाबतीत) दिसला नसता. मुस्लिमांना परंपरावादी आणि त्यांच्या भावना दुखावतात आणि धर्मामध्ये हस्तक्षेप होतो याच्या नावाखाली मुस्लिम समाजामध्ये ज्या मूलगामी सुधारणा करण्याची गरज होती त्या केलेल्या दिसत नाहीत.

२) संघ परिवाराची जातीद्वेषाची भूमिका :

ज्या संघ परिवाराची भारतामध्ये उभारणी झाली त्याची विचारसरणी काय हे जाणून घेतल्याशिवाय संघ परिवाराच्या जातीद्वेषाच्या भूमिकेचे आकलन होवू शकत नाही. "१९२३ साली स्वा. सावरकरांनी 'हिंदुत्व' या आपल्या मूळ इंग्रजी ग्रंथात हिंदू राष्ट्राची संकल्पना, त्यांच्या नागरिकत्वाची व्याख्या विस्ताराने मांडली आहे. त्यांची मूळ संस्कृत व्याख्या अशी आहे.

'असिंधु सिंधुपर्यंता यस्य भारत भूमिका
पितृभू: पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृत:'

या व्याख्येप्रमाणे सिंधु नदीपासून सिंधू सागरापर्यंत पसरलेल्या या भूमिचा वारसा पितृपरंपरेने ज्याला लभला आहे आणि ज्याचा धर्म या देशात जन्मला आणि विकसित झाला तो स्वत:ला हिंदू म्हणून घेऊ शकतो आणि तोच हिंदू राष्ट्राचा नागरिक होऊ शकतो. असे स्पष्टीकरण खुद्द स्वा. सावरकरांनीच दिले आहे. यावरून ख्रिश्चन, मुसलमान, पारशी, ज्यू इत्यादींची ही भूमिका पुण्यभू होत नसल्यामुळे ते या हिंदु राष्ट्राचे नागरिक होऊच शकत नाहीत. यामध्ये शंका राहु नये म्हणून त्यांनी आणखी तिसरी भूमिका मांडली ती म्हणजे समान इतिहास, समान वाङ्मय, समान कला, एक निर्बंध विधान, एक धर्मव्यवहारशास्त्र, सामायिक यात्रा, सामायिक धार्मिक आचारविधी, सामायिक सण आणि सामायिक संस्कार एवंगुण विशिष्ठ अशी जी हिंदु संस्कृती ती त्यास आपली वाटणे होय. ही सर्व चर्चा उपरोक्त ग्रंथात पृ. क्र. ८० ते ११८ मध्ये विस्ताराने आलेल्या आहेत.''[३८] या विचारसरणीच्या आधारेच डॉ. हेडगेवार यांनी

१९२५ सली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. "१९२५ ते १९७० या काळात स्वा. सावरकर आणि डॉ. हेगडेवार यांच्यातील परस्पर नाते तणावाचे असले तरी मुसलमान द्वेष हा मुद्दा समान आहे."[३९]

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल, रामराज्य परिषद अशा संघपरिवाराच्या माध्यमाने सतत हिंदू-मुस्लिम जातीय द्वेष पसरवला जातो. त्यातून आजपर्यंत बाबरी मस्जिद प्रश्न असो अथवा गुजरातमधील दंगली असोत या जातीद्वेषातूनच घडल्या. संघपरिवार नेहमी मुस्लिम समुदायाला परकीय, हिंसक, देशद्रोही म्हणून चुकीचा प्रचार करतात. णुस्लिम समाजाची संस्कृती भिन्न आहे. त्याची धार्मिक श्रद्धास्थाने भिन्न आहेत त्यामुळे ते भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात समरस होत नाहीत असे सांगत असताना मात्र मुस्लिम समाज हा राष्ट्रीय प्रवाहातील अविभाज्य अंग आहेत हे सोयीस्कररित्या विसरलेले असतात. स्वातंत्र्य संग्रामापासून बहादूर शहा जफर, मौलाना आझाद, बद्रुद्दीन तैय्यबजी, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान अशा अनेक देशभक्त मुसलमानांचा या मंडळींना विसर पडलेला असतो. संस्कृतिच्या आधारावर सांस्कृतिक राष्ट्रवाद मांडणाऱ्या संस्कृतिनिष्ठांना मुळात संस्कृती या शब्दाचा अर्थ उमगलेला नसतो. "संस्कृति ही केवळ धर्मामुळे ठरत नसते. ती संस्कृती ही लोक समुदायाच्या सृजनशील जीवनाचा परिणाम असून, समाज जीवन जगत असताना संबंधित लोकसमुदायातून विकसित झालेल्या संस्था, सार्वजनिक जीवन, कला, विचार रितीरिवाज, धर्म भाषा आणि तत्वज्ञान आणि विविध लोकसमुदायातील परस्पर संबंध यातून ती निर्माण होत असते. संगीत, साहित्य धर्मपरंपरा, वर्तन यांच्या सहाय्याने निर्माण केलेली कला आणि तंत्रज्ञान हा देखील संस्कृतिचा भाग असतो. संस्कृती ही त्या लोकसमुदयाची संपूर्ण जीवन पद्धती असते. संस्कृती सहभाग आणि सहजीवनावर अवलंबून असते. भारतीय मुसलमानांची संस्कृती ही त्यांच्या भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील वास्तव्यामधून विकसित झालेली आहे. त्यांच्या लोकसंख्येच्या १% देखील

मुसलमान हे "बाहेरून' आलेले नाहीत. केरळ, कोकण, पंजाब वायव्य सरहद्द प्रदेशात बाहेरून आलेल्या मुसलमानांचे प्रमाण २% ते ५% दिसून येते. बाकीचे सर्व मुसलमान इथले मूळ निवासी असल्याने धर्मांतरापूर्वी असणाऱ्या मूळच्या सर्व खाणा-खुणा, उदरनिर्वाहाचे व्यवसाय, आर्थिक जीवन, जाती-जमातींची वैशिष्ट्ये, सामाजिक आणि सांस्कृतिक घटक, जाती व्यवस्था वगैरे सर्व पैलूंचे प्रभाव मुसलमानात दिसून येतात."[४०]

अर्थात भारतीय मुसलमानांची सांस्कृतिक जडण-घडण भारतीय समाजजीवनाशी समरस झालेली आहे. सर्वसामान्य हिंदू-मुस्लिम नागरिक परस्पराशी व्यवहार करताना बंधुभाव जपतात परंतू हिंदु-मुस्लिम या दोन्ही समुदायामध्ये ज्या प्रतिगामी शक्ती आहेत. त्यामूळे हा द्वेष बळावतो. गेली काही दशके संघपरिवाराने कमलीचा हिंदु-मुस्लिम जातीय द्वेष पसरवला आणि त्यात यशही मिळविले.

संघपरिवाराच्या माध्यमाने इतिहासाचे विकृतिकरण केले जाते. मध्ययुगीन इतिहासाला ते सत्तेचा संघर्ष न मानता धर्मसंघर्ष म्हणून जनसामान्यात मांडून जातीद्वेष पसरवतात. हिंदुत्ववादी संघटनांची मुख्यत: तीन उद्दिष्ट्ये आहेत. "पहिले हिंदुत्वाच्या भावनेचा वापर करून इतरांच्याबद्दल द्वेषभावना निर्माण करून भारताची सत्ता आपल्या ताब्यात घेणे. दुसरे सत्ता हाती आल्यानंतर अल्पसंख्यांकांवर सर्व प्रकारचे सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित करणे. त्यांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याची गळचेपी करून त्यांना आपणास हव्या त्या मार्गाने वागण्याची सक्ती करणे. तिसरे सर्व भारतीय उपखंडावर हिंदूंचे अधिराज्य आणि वर्चस्व प्रस्थापित करणे."[४१] इत्यादी संघपरिवाराची ही उद्दिष्ट्ये कमालीचा जातीद्वेष करणारी आहेत. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी बळाचा वापर ते करणार हे तितकेच खरे आहे कारण बळाच्या वापराशिवाय आणि हिंसेशिवाय त्यांना या उद्दिष्टाची पूर्तता करणे शक्य नाही. परंतू भविष्यात हि उद्दिष्ट्ये साध्य करणे त्यांना कधीच शक्य होणार नाही.

"संघाला अभिप्रेत असणारा हा युद्धखोर आणि अतिरेकी राष्ट्रवाद देशाला नि:संशय घातक ठरणार आहे कारण मूलत: या विस्तारवादी प्रवृत्ती फॅसिस्ट विचार सरणीचे पोषण करीत असतात. हिंदुत्ववाद्यांच्या विचारात एक दुटप्पीपणा आहे. काही गोष्टी ते बोलतात पण त्या गोष्टी त्यांना अभिप्रेत नसतात. मुसलमानांना 'आपले' म्हणत असतानाही त्यांच्याबद्दल खाजगी प्रचारात द्वेषभावना पसरविणे मशिदीचे संरक्षण करतो. म्हणून मशिदीचा नाश करणे, स्वत:स सांस्कृतिक संघटना म्हणून घोषित करणे पण प्रत्येक बैठकीत सर्व प्रकारचे राजकीय ठराव संमत करणे. भारतीय राज्यघटना मान्य आहे असे म्हणत खाजगीत तिची निंदा करणे. अशी दुटप्पीपणाची भूमिका घेतली जाते. राष्ट्र ही संकल्पना सामाजिक आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. परंतु राष्ट्रापेक्षाही महत्त्वाचा घटक-म्हणजे आपण सर्व माणूस आहोत. माणूस म्हणून आपण एकमेकास काही देणेघेणे लागतो. भाषा, वंश, राष्ट्र, धर्म हे भेद त्यानंतरचे आहेत. आपत्तीसमयी या भेदभावावर मात करून परस्परांना मदत करीत असतो. त्यामुळे माणसांतील आपपरभाव, वैरत्व, संघर्ष आणि विषमता दूर करीत त्या विचारांना दूर करावे. ज्यामुळे द्वेष आपपरभाव वाढतो. अशा विचारांचा त्याग केला पाहिजे. आज भारतालाच नव्हे तर सर्व जगाला धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाशिवाय दुसरा पर्याय नाही. सर्व समावेशक प्रगमशील सहिष्णु आणि उदार राष्ट्रवादाची आपणास गरज आहे."[४२].

संघ परिवाराच्या माध्यमाने हिंदु समाजात जो मुस्लिम द्वेष वाढवला जातो. त्यामुळे जातीय ताण-तणावांना सामोरे जावे लागते. अशा हिंसक विचारसरणीने राष्ट्रउभारणी तर होतच नाही उलट राष्ट्रीय एकात्मतेसमोर प्रमुख अडथळा निर्माण होतो. म्हणून हमीद दलवाई यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांची गरज आहे. शेवटी तात्पर्य असे की द्वेष, हिंसा, तिरस्कार, आपपरभाव या आधारे तयार झालेल्या मानसिकतेतून जो उद्रेक होतो त्याची परिणती हिंसेतच होत असते. मग ती मानसिकता बहुसंख्यांकाची असो अथवा अल्पसंख्यांकाची दोघांचीही विद्रोही मानसिकता राष्ट्राला आणि राष्ट्राच्या एकात्मतेला माणूसकीला घातक आणि काळीमा फासणारीच आहे.

**मुस्लिम समाजामध्ये सामाजिक सुधारणांची गरज :**

मुस्लिम समाजामध्ये मुलगामी सामाजिक सुधारणांची गरज आहे. त्यामध्ये शिक्षण प्रसार, स्त्रीयांचे अधिकार, विवेकनिष्ठा किंवा वैज्ञानिकदृष्टीकोन, धर्मचिकित्सा इत्यादी घटक येतात.

मुस्लिम समाजात शिक्षकाचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. भारतातील अल्पसंख्यांकातील सर्वात मोठा अल्पसंख्यांक समुदाय मुस्लिम हा आहे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये इतक्या मोठ्या धार्मिक समुदायाला वगळून किंवा शैक्षणिक प्रसारापासून दूर ठेवून विकासाकडे वाटचाल करणे अशक्य आहे. मुस्लिम समाजामध्ये धार्मिक सनातनी मंडळी मुलांना मदरसा शिक्षण पद्धतीचा आग्रह धरतात. तसेच मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार न होण्यामागे आर्थिक घटक ही कारणीभूत आहेत. मुस्लिम समाजातील बहुसंख्य वर्ग हा दुरूस्ती व किरकोळ व्यवसायात आहे त्यामुळे या समाजात कमालीचे आर्थिक दारिद्र्य आहे. दारिद्र्यामुळे या समाजाचा कल शिक्षणाकडे दिसत नाही. त्यामुळे हा समाज शिक्षणापासून दूर राहतो या समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्रयत्नाची गरजेचे आहे.

दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे स्त्रीयांच्या हक्काविषयी मुस्लिम व्यक्तीगत कायद्याने जरी स्त्रीला वारसा हक्क दिलेला असला तरी मुस्लिम स्त्रीवर अनेक बंधने दिसून येतात. त्यामध्ये परदा पद्धत, जूबानी तलाक, बहुपत्नीत्व, कुटुंबनियोजनामध्ये स्त्रीयांना अधिकार नसणे, पोटगी, इत्यादी अनेक प्रश्न मुस्लिम स्त्रीयासमोर आजही भेडसावत आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई यांनी या प्रश्नांना घेवून मुस्लिम स्त्रीयांना न्याय हक्क देण्यासाठी योग्य लढा दिलेला आहे परंतू स्त्रीयांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणेही गरजेचे आहे. स्त्रीशिक्षणाचा क्रांतीकारी पुरस्कार करणे आजही गरजेचा आहे.

हमीद दलवाईंने मुस्लिम स्त्रीयांना हक्क मिळवून देण्यासाठी 'समान नागरी कायद्याची' मागणी केली. समान नागरी कायदा मुस्लिम स्त्रीयांच्या न्याय हक्कासंबंधी आहे. मुस्लिम समाजात मुस्लिम व्यक्तीगत कायद्यामुळे मुस्लिम स्त्रीयांना पुरूषसत्ताक वर्चस्वाखाली दबून राहवे लागते. याच शरीयत कायद्याने जरी स्त्रीयांना वारसा हक्क दिला असला तरी आजच्या परिस्थितीमध्ये आणि प्रत्यक्ष व्यवहारात मुस्लिम स्त्री-पुरूषी वर्चस्वातून मुक्त नाही. मुस्लिम स्त्रीयांच्या प्रश्नासाठी हमीदभाई झगडले. त्यांना मुस्लिम स्त्रीयांच्या मुक्तीसाठी आणि मुस्लिम व्यक्तीगत कायद्यामध्ये असणाऱ्या कालबाह्य घटक काढून द्वीभार्या कायदा नष्ट करण्याची त्यांची मागणी होती. भारतीय समाजजीवन केवळ एकाच कायद्याने नियंत्रीत व्हावे असे त्यांना वाटे म्हणून समान नागरी कायदा करण्याची त्यांची ठाम भूमिका होती.

"भाजप व संघपरिवाराची समान नागरी कायद्याबद्दलची भूमिका आणि हमीद दलवाई यांच्या समान नागरी कायद्याच्या भूमिकेबद्दल फरक आहे. भाजपची आणि समस्त संघपरिवाराची समान नागरी कायद्याची मागणी करण्याची भूमिकाही फसवी आणि भंपक आहे. मुस्लिम स्त्रीची पुरूषप्रधान संस्कृतीतून मुक्तता, तिला न्याय आणि कायद्याचे संरक्षण मिळणे, याच्याशी त्यांच्या समान नागरी कायद्याच्या मागणीचा कसलाही संबंध नाही. मुस्लिम विरोधाचे एक प्रभावी हत्यार म्हणून हे ही मागणी सतत करत असतात. समान नागरी कायद्याबाबत सर्वसहमतीचे वातावरण तयार होत नाही तोवर थांबणे आवश्यक आहे. ही भूमिका भाजपची फसवी आहे. कारण हिंदू-कोडबील पास कले त्यावेळी सनातनी मंडळींचा विरोध झालेला होता तरीही ते पास झाले."[४३] समान नागरी कायद्याबद्दल सर्वसहमतीचे वातावरण निर्माण होण्याची वाट ही मंडळी का बघतात. सामाजिक सुधारणा करताना विरोध होत असतो म्हणून सुधारणा करायचे थांबायचे नसते.

हमीद दलवाई यांच्या मते मुस्लिम समाज मध्ययुगीन मानसिकतेतून बाहेर पडलेला नाही. मध्ययुगीन कालबाह्य प्रथा, परंपरांना तो धर्म म्हणून कवटाळून बसलेला आहे. बदलत्या काळात या कालबाह्य प्रथा सोडून द्यावा लागतात इस्लाम मध्ये ज्या प्रथा परंपरा कालबाह्य व विद्रुप आहेत त्या बदलणे गरजेचे आहे. अर्थात मुस्लिम समाजाने धर्माकडे बघण्याचा आपला पारंपरिक दृष्टीकोन बदलून वैज्ञानिक दृष्टीकोन अवलंबला पाहिजे. धर्माचा सारासार विचार करण्याची परंपरा घालून घेतली पाहिजे. कारण इस्लामला परिपूर्ण आणि ईश्वरीय समजण्यात आल्याने त्याची चिकित्सा करण्यास मुस्लिम समाज तयार होत नाही. मुळात ही मानसिकता बदलून धर्माचा चिकित्सक व बौद्धीक दृष्टीने नव्याने अर्थ लावण्याची परंपरा समाजाने चालू केली पाहिजे अशी भूमिका दलवाईंनी मांडलेली आहे. दलवाई यांची धर्मचिकित्सेचा दृष्टीकोन योग्य वाटतो कारण बदलत्या काळात धर्माकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे हे तितकेच खरे आहे.

**हमीद दलवाई यांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाबद्दल ची भूमिका :**

"धर्मातीतता, धर्मनिरपेक्षता, इहवाद या प्रतिशब्दांनी परिचित असलेले 'सेक्युलॅरिझम' (धर्मनिरपेक्षता) हे मुल्य हमीद दलवाई यांचा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीयत्व, विज्ञाननिष्ठा आदि आधुनिक जागतिक मुल्यांइतकेच महत्त्वाचे वाटते होते. सेक्युलॅरिझम मुस्लिम समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनात वागवणे त्यांना आपल्या कामाच्या दृष्टीने आत्यधिक आवश्यक वाटे." हमीद दलवाई यांनी प्रा. अ. भी. शाहा यांच्याबरोबर 'इंडियन सेक्युलर सोसायटीची सन १९६८ ला स्थापना केली. हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्षता महत्वपूर्ण मुल्य मानले.' धर्मनिरपेक्षता म्हणजे, धर्म आणि सजकारण यांना वेगवेगळे मानने धर्मसत्ता आणि राजसत्ता परस्पर भिन्न समजने म्हणजे धर्मनिरपेक्षता.

हमीद दलवाई धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची मांडणी करताना धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेची मांडणी करतात. धर्म आणि राज्यसंस्था या दोन्ही घटकांना ते भिन्न मानतात. हिंदु-मुस्लिम समाजातील सनातनी, प्रतिगामी जमातवादी प्रवृत्तीला ते विरोध करतात. जमातवाद हिंदुंचा असो अथवा मुस्लिमांचा दोन्ही प्रकारचा जमातवाद धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय एकात्मतेला घातक आहे अशी त्यांची धारणा आहे.

भारताची शासनव्यवस्था धर्मनिरपेक्ष असली पाहिजे. राजकारणामध्ये धर्माची लुडबूड असता कामा नये, शासनाचे धोरण सहिष्णूतेचे असले पाहिजे त्यामध्ये आपपरभाव असता कामा नये. दलवाई वर समाजवादी विचारांचा पगडा होता कारण ते राष्ट्रसेवादलाच्या वातावरणात वाढले होते. शासनाच्या धोरणात नि:पक्षपातीपणा असला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. महाराष्ट्राच्या बाबतीत महाराष्ट्रीयन लोकांची भाषा मराठी असली पाहिजे. त्यातूनच मुस्लिम समाजानेही शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांचे मत आहे. उर्दूचा आग्रह मुस्लिम समाजाने धरू नये असे ते सांगत.

हमीद दलवाई यांना हिंदू-मुस्लिम समाजातील वाढता मुलतत्ववाद आणि जमातवाद राष्ट्रीय एकात्मतेसमोरील अडथळा वाटतो. हिंदू-मुस्लिम समाजामध्ये वाढत्या द्वेषाने भारताची फाळणी कशी झाली याचा सविस्तर आढावा मागे आलेला आहेच. धर्मसुधारणेच्या कामात धर्मनिरपेक्षता आड येत नाही. असे दलवाईंचे मत होते मुस्लिम समाजात धार्मिक सुधारणा करावयाची झाल्यास त्यांना तो धर्मातील हस्तक्षेप वाटतो. त्याच मानसिकतेतून 'पोटगीला' विरोध होतो. मुस्लिम स्त्रीयांना 'परदा' पद्धतीमध्ये बंदीस्त करण्यात येते. समान नागरी कायद्याला त्या मानसिकतेतून विरोध होतो. कालबाह्य प्रथा, परंपरा टाकून द्याव्या लागतात. हे मुस्लिम समाजाला न उमगल्याने त्याच्या आधुनिकतेमध्ये अडचणी येतात. दलवाईंना जातीवाद व जातियतेला धर्मनिरपेक्ष शासनव्यवस्थेत थारा द्यायचा नव्हता कारण त्यामूळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते अशी त्यांची ठाम भूमिका होती.

"ज्या हिंदूना मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे ते हिंदूंना सनातनी बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि ज्या हिंदूंना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यायचे आहे ते मुस्लिम जातीयवाद्याना मिठ्या मारीत आहेत. हे दृश्य बदलले पाहिजे. मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदुच्या मी बाजूचा आहे, पण हिंदूना सनातनी बनविण्याचा त्यांच्या प्रयत्नांचा मी विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूना आधुनिक बनवणाऱ्यांना माझा पाठींबा आहे. परंतु मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे."[४४] अर्थात जमातवाद्यांना दलवाईंचा विरोध आहेच पण जमातवाद पोसणाऱ्या हिंदू-मुस्लिम समाजातील सनातनी प्रतिगामी शक्तींना ही विरोध आहे. दलवाई यांना शुद्ध अशी धर्मनिरपेक्षता हवी आहे असे दिसते.

"भारतामध्ये आधुनिकतेवर भर दिला गेला, नागरी स्वातंत्र्य व कायद्याचे राज्य कटाक्षाने पाळले गेले, लोकशाही प्रणालीला निष्ठा अर्पण केली व नागरिकांनी धर्मस्वातंत्र्य पाळूनही राज्य व धर्म अलग ठेवले तर बहुसंख्य-अल्पसंख्य हा प्रश्न निश्चित संपेल."[४५] दलवाई यांचा सतत धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांना वेगवेगळे ठेवण्याचा कटाक्ष होता. दलवाई धर्मस्वातंत्र्याचे समर्थन करत होते. प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्मानुसार अचरण करता आले पाहिजे असे ते मानीत. स्वत: नास्तीक होते परंतु आपली नास्तीकतेची भूमिका इतरावर कधीच ते लादण्याचा प्रयत्न करीत नसत. ही त्यांची व्यक्तीगत बाब होती. हमीद दलवाई यांची मांडणी बुद्धीप्रामाण्यवादी आहे. धर्मग्रंथावर ती आधारित नाही. त्यांच्यासारखी सडेतोड मांडणी यापूर्वी झालेली नाही.

समकालीन परिस्थिती पाहता हिंदू-मुस्लिम वाढती जातीयता यामुळे राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मरिपेक्ष भारतीय समाजव्यवस्थेसमोर जे आव्हान उभे आहे. त्या आव्हानाला सामारे जाण्यासाठी जी शक्ती लागेल ती शक्ती दलवाई यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारमध्ये निश्चितपणे आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**हमीद दलवाई यांनी हिंदू राष्ट्रवादाबद्दल केलेली चिकित्सा :**

हमीद दलवाई यांना हिंदू-मुस्लिम समाजामध्ये वाढणारी धर्मांधता ही धर्मनिरपेक्षते समोरील मुख्य अडचण वाटत होती. वाढती हिंदू-मुस्लिम धर्मांधता ही त्यांना घातक वाटत होती. हमीद दलवाई यांनी ज्याप्रमाणे मुस्लिम जमातवादावर प्रहार केला त्याच प्रमाणे वाढत्या हिंदूत्ववादी शक्तीवरही कडक टीका केली. हिंदूराष्ट्रवादाचा उदय कसा झाला याचे यापूर्वी विवेचन आलेले आहे.

हमीद दलवाई यांनी हिंदू राष्ट्रवादाची चिकित्सा केली. "मुस्लिम समाजाच्या संकुचित धर्मवादाला आणि जातीयवादाला विरोध करणे काही पाप होत नाही. प्रश्न या विरोधाचे स्वरूप कोणते असावे हा आहे. धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेच्या चौकटीत मुस्लिम समाजाच्या धर्मनिरपेक्षताविरोध वर्तनाला विरोध करीत राहणे हा एक मार्ग ठरतो. यामुळे आपण आपोआपच धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेची चौकट बळकट करण्याच्या प्रक्रियेला हातभार लावतो. हिंदुत्ववाद्यांचा मुस्लिम धर्मवादाला आणि जातीवादाला होणारा विरोध या मार्गात बसत नाही."[४६]

हमीद दलवाई धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे समर्थक होते. मुस्लिम जमातवादाचा विरोध करण्यासाठी हिंदूनी सनातनी वृत्ती जोपासने आणि धर्मांध भूमिका घेणे म्हणजे त्यांना तेल ओतून आग विझविण्याचा प्रकार वाढतो त्यामूळे उलट जातीय ताणतणाव वाढतो. जमात वाद, धर्मांधता मग तो बहुसंख्यांकाचा असो अथवा अल्पसंख्यांकाचा दोन्ही प्रकारची जमातवाद, धर्मांधता घातक आहे असे ते मानतात. धर्मवादाला, जमातवादाला विरोध झाला पाहिजे अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. मुस्लिम जमादवादाला नष्ट करण्यासाठी त्यांना हिंदू जमातवाद हा पर्याय योग्य वाटत नाही. त्याचे हे मत बरोबर आहे कारण यामुळे उलट दोन्ही समुदायामध्ये आपपरभाव अधिक वाढतो.

"हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व या दोन वेगळ्या बाबी आहेत आणि सावरकरांचा किंवा गोळवलकरांच्या हिंदुत्ववादाने आपल्या राष्ट्रवादाचे प्रश्न सुटत नाहीत. उलट राष्ट्रवादाच्या विकासात ते अडसर निर्माण करतात."[४७]

भारतीय समाजव्यवस्था विविधतेने नटलेली आहे त्यामध्ये धर्म, भाषा, वंश परंपरा, भाषा, प्रदेश यामध्ये भिन्नता आहे परंतु या भिन्नतेमधूनही निकोप असे सामायिक राष्ट्रीयता निर्माण झालेली आहे. दलवाई यांनी हिंदुत्वाची मांडणीचे तीन विचारप्रवाह सांगीतले. पहिल्या विचारप्रवाहात वैदिक काळाला आदर्श मानणारे आर्यसमाजी येतात तर दुसऱ्या प्रवाहात चार्तुवर्णाच्या चौकटीवर श्रद्धा ठेवणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ येतो तर तिसऱ्या मध्ये हिंदू राष्ट्रवादाच्या प्रेरणा लाभलेले हिंदू-महासभावादी बसतात. हिंदू महासभा हा पक्ष इतिहासजमा आहे परंतु त्याचा वारसा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विश्वहिंदू परिषद, बजरंग दलासारखे संघपरिवार चालवत आहेत.

हिंदूत्ववादाचे हे "तीन मतप्रवाह तीन व्यक्तीनी घातलेल्या भिन्न वैचारिक पायांवर आधारलेले आहेत. स्वामी दयानंद हे आर्य समाजाचे प्रणेते होते. आणि हेगडेवार व गोळवलकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाया दृढ केला आहे. हिंदू राष्ट्रवादाच्या, हिंदूमहासभेच्या घोषणेचे जनक श्री. वि. दा. सावरकर होते."[४८] आजही "धर्मनिरपेक्षता ही हिंदुत्ववाद्यांना आपल्या विचारसरणीच्या मुळाशी येते अशी त्यांची श्रद्धा आहे. मुस्लिम जातीयवादाच्या संरक्षणाचा पहिला तह धर्मनिरपेक्षतेची राजवट हा आहे आणि तो जमीनदोस्त केल्याखेरीज मुस्लिमांशी सरळ दोन हात करता येणार नाहीत असेच ते मानीत आले आहेत."[४९]

हिंदुत्ववाद हा सांस्कृतिक राष्ट्रवाद आहे या राष्ट्रवादामध्ये मुस्लिम, ख्रिश्चन येत नाहीत. कारण त्यांची भारत ही पुण्यभू व पितृभू नाही. असे हिंदुत्वनिष्ठांची भूमिका आहे. "सांस्कृतिक राष्ट्रवाद हा संकुचित असतो. हिंदुत्वही एक राजकीय विचारसरणी

आहे. हिंदूत्व आणि हिंदू धर्म एकमेकापासून फार वेगळे आहेत. हिंदु धर्मातील सहिष्णुता उदारता आणि सर्वसमावेशकता यांच्या विरोधी हिंदुत्व आहे. केवळ हिंदूची अशी राजकीय अस्मिता विकसित करणे, आपपरभावास चालना देवून समाजात विग्रह निर्माण करणे आणि त्याद्वारे सत्ता ताब्यात घेणे हे हिंदुत्ववाद्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. धर्माचा राजकारणासाठी वापर, करणारे लोक खरे धार्मिक नसतात. धर्माचा वापर त्यांना सत्ताप्राप्तीसाठी कलह माजविण्यसाठी करायचा असतो.''[५०]

हमीद दलवाई हिंदुत्वाची चिकित्सा करताना हिंदुत्वनिष्ठांकडून मुस्लिम समाजाबद्दल द्वेष पसरविण्यासाठी केलेल्या आरोपांवर प्रकाश टाकतात ''गोळवलकर गुरूजी किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने वेदकाळ आदर्श ठरतो. दुर्देवाने हिंदूच्या अध:पतनाचा तो काळ होता. तो हिंदूचा आदर्श काळ समजून ते कवटाळून बसले. मात्र मुस्लिम हे आक्रमक आहेत, परके आहेत, त्यांना घालवून दिले पाहिजे. त्यांचे आणि हिंदूंचे कधीच पटणार नाही ही गोळवलकरांची ठाम मते होती.''[५१] हिंदूमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उभा राहिला. त्याच्या विरोधात मुसलमान 'खाकसार' जमातवादी संघटना उभी राहिलेली दिसते. खाकसार आणि अहरार या मुस्लिम जातीवादी संघटना उघड उघड जातीय दंगली घडवून आणत तशाच जातीय दंगली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने घडविलेल्या आहेत. म्हणून या धर्मांध शक्तींने राष्ट्रीय एकात्मतेचा विचका उडतो. हमीद दलवाई यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार प्रस्तुत ठरतात.

''स्वा. सावरकर हे हिंदुत्ववाद्यातील अग्रणी होते. त्यातल्या त्यात ते आपल्या विचारांना शास्त्रीय बैठक देत होत. त्यांना अस्पृश्यता अमान्य होती चातुर्वण्य मान्य नव्हते. खरे तर ते ईश्वराचे अस्तित्वही मान्य करीत नव्हते. विज्ञानाची कास धरण्यामुळे समाजाची प्रगती होईल अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांना हिंदूधर्माचे राज्य अभिप्रेत नव्हते आणि तरीही त्यांनी भारत हे हिंदू राष्ट्र आहे अशी घोषणा त्यांनी केलेली आहे.''[५२] अशी टीका हमीद दलवाई यांनी केलेली आहे. सावरकर हिंदू राष्ट्रामध्ये

सैन्यात मुस्लिमाना स्थान नव्हते. तरीही ते समान असणारे हिंदूराष्ट्र होणार असे सांगत म्हणजे यामध्ये कसली समता येणार होती? "वस्तुत: देशात समानता असेल आणि हिंदू राष्ट्रही असेल या परस्पराविरोधी विधानांचा विचार केला की सावरकरांचा वैचारिक दृष्टीकोन स्पष्ट होतो. तो म्हणजे मध्ययुगीन प्रेरणांवर आधुनिक विज्ञानाचे केलेले कलम अशी त्याची घडण आहे असे वाटू लागते."[५३] दलवाई यांच्या मते सावरकरांच्या आधुनिकतेला मुस्लिमविरोधाची बैठक लाभलेली आहे. या त्यांच्या आधुनिक विचारांच्या बैठकीचा संदर्भ ध्यानी घेतला म्हणजे सावरकरांना मुस्लिम समाजाची भीती वाटत होती हे लक्षात येते."[५४]

दलवाई यांच्या मते आरंभी सावरकर मुस्लिम विरोधी नव्हते १८५७ च्या युद्धावर लिहिलेल्या त्यांच्या पुस्तकात मुस्लिमविरोधी अंशही सापडत नाही. अंदमानला कैदेत असताना कैद्यांवर त्यांनी मुस्लिम पहारेकऱ्याकडून होणारे अत्याचार पाहिले. तेव्हापासून त्याची मानसिकता मुस्लिम विरोधी बनत गेली. दलवाई यांनी हिंदुत्वाची चिकित्सा करताना जनसंघावरही ते टीका करतात.

"अखंड भारत व्हायचा असेल तर तो केवळ हिंदूंना एका राष्ट्रीय व्यासपीठावर आणून होणार नाही. हिंदू आणि मुसलमान या दोघांची मने, एकराष्ट्रीय जीवनात नांदू शकतील, अशी तयारी केल्याखेरीज अखंड हिंदूस्थान होऊ शकला नसता आणि यापुढेही होऊं शकणार नाही."[५५] करायचे तर धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे प्रवाह मजबूत करावे लागतील. तात्पर्य असे की भारताची राष्ट्रीय एकात्मता आणि विकासाचा अंतिम टप्पा गाठावयाचा असेल तर निकोप असा हिंदू-मुस्लिम बंधुभाव जोपासला पाहिजे. दोन्ही समाजातील जमातवादी शक्तींना कसा आवर घालता येईल आणि निरोगी अशी समतेवर आधारित शुद्ध धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था अधिक मजबूत करता येईल हे करणे प्रत्येक भारतीयांची नैतिक जबाबदारी आहे. आणि एक भारतीय म्हणून हमीद दलवाई यांनी ती कर्तव्यभावनेने पार पाडलेली आहे.

म्हणून "राष्ट्र ही संकल्पना आपल्या सामाजिक आणि आर्थिक विकासात साह्य करणे म्हणून ती आपणास हवी आहे. पण राष्ट्रांपेक्षाही एक गोष्ट महत्त्वाची आहे. आणि ती म्हणजे शेवटी आपण सर्व माणूस आहोत. माणूस म्हणून आपण एकमेकास काही देणेघेणे लागतो. भाषा, वंश, राष्ट्र, धर्म हे भेद त्यानंतरचे आहेत व आपत्तीसमयी या भेदांवर मात करून आपण एकमेकांस मदत करीत असतो. ज्यामुळे माणसातील आपपरभाव, वैरत्व, संघर्ष आणि विषमता दूर होईल, त्या विचारांना आपण जवळ केले पाहिजे. ज्यामुळे हा आपपरभाव वाढीस लागेल आणि माणसं माणसांचा बळी घेऊ लागतील अशा विचारांचा आपण त्याग केला पाहिजे."[५६] दलवाई यांच्या विचारात मानवतावादी दृष्टीकोन आहे. हिंदू-मुस्लिम जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी त्यांनी धर्मांध शक्तींना विरोध या भूमिकेतून केलेला दिसतो. म्हणून मानवामानवातील संबंधाचा विचार एक माणूस म्हणून करावा लागेल. कारण मानवतावादी दृष्टीकोनातून समाजातील बऱ्या वाईटाचा फरक करता येवू शकतो. आणि त्याच्या माध्यमानेच कोणती विचारधारा चांगली कोणती वाईट हे ठरविण्याचे सामर्थ्य प्राप्त होवू शकते.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) प्रकाशक, मुस्लिम सत्यशोधक मंडळ – '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ, दोन दशकांची वाटचाल*', १९८९, पृ. क्र. ०३.

२) दलवाई हमीद – '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना प्रकाशन, २००२, पुणे, पृ. क्र. ०१.

३) उक्त – पृ. क्र. ०१.

४) वंद्योपाध्याय शैलेशकुमार – '*दंगो का इतिहास*', सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, २०००, पृ. क्र. १४, १५.

५) प्रा. बेन्नुर एफ. एच. – '*भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता*', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधनी, १९९५, अंक ५ व ६, पृ. क्र. २०.

६) दलवाई हमीद – '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना प्रकाशन, २००२, पुणे, पृ. क्र. ०६.

७) उक्त – पृ. क्र. ०९.

८) उक्त – पृ. क्र. १०, ११

९) उक्त – पृ. क्र. ११, १२

१०) उक्त – पृ. क्र. १२.

११) डॉ. चौसाळकर अशोक – '*शहीद भगतसिंग जीवन व कार्य*', प्रकाशन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००६, पृ. क्र. १३.

१२) जमादार हुसेन – '*मुस्लिम मनाचा कानोसा*', मानसंमान प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. क्र. १५.

१३) उक्त – पृ. क्र. १६, १७.

१४) Fatma A. S. – '*Social Reform Movements among Indian Muslim*', unpublished Ph.D. Thesis, Dr. Babasaheb Ambedkar Marathwad University, Awarangabad, Page No. 217.

१५) आ. जावडेकर श. द. व आ. भागवत स. ज. – *'हिंदू-मुस्लिम ऐक्य'*, प्रकाशक, रघुनाथ ग. जोशी, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९४५, पृ. ०२, ०३.

१६) प्रा. बेन्नुर एफ. एच. – *'भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता'*, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, १९९५, अंक ५ व ६, पृ. क्र. २९.

१७) प्रा. पळशिकर वसंत – *'जमातवाद राष्ट्र धर्म आणि धर्मनिरपेक्षता'*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. २५.

१८) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, पुणे, २००२, पृ. क्र. ३४.

१९) उक्त – पृ. क्र. ३५.

२०) Khan Ahamad – '*A Reinterpretation of Muslim Theology*', Christian W. Troll, Vikas, Delhi, 1978, Page No. 73 to 85.

२१) डॉ. पळशिकर वसंत – *'जमातवाद राष्ट्र धर्म आणि धर्मनिरपेक्षता'*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. २७.

२२) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, पुणे, २००२, पृ. क्र. ३८.

२३) उक्त – पृ. क्र. ३९.

२४) उक्त – पृ. क्र. ४१.

२५) उक्त – पृ. क्र. ४१.

२६) उक्त – पृ. क्र. ४३, ४३.

२७) आ. जावडेकर श. द. व आ. भागवत स. ज. – *'हिंदू-मुस्लिम ऐक्य'*, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला विश्वस्त मंडळ, पुणे, १९४५, पृ. क्र. ०३.

२८) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, पुणे, २००२, पृ. क्र. ४७.

२९) उक्त – पृ. क्र. ४९, ५०.

३०) उक्त — पृ. क्र. ५१

३१) उक्त — पृ. क्र. ५३.

३२) उक्त — पृ. क्र. ६१.

३३) उक्त — पृ. क्र. ६४.

३४) बाळ प्रकाश व बेडकिहाळ किशोर (संपा.) — '*धर्म, राजकारण, वस्तूस्थिती आणि विपर्यास*', अक्षर प्रकाशन, डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा, २००३ पृ. क्र. ११, १२, १३, १४.

३५) उक्त — पृ. क्र. १३, १४.

३६) दलवाई हमीद — '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना पक्राशन, पुणे, २००२, पृ. क्र. २१०.

३७) मुकादम अ. का. — '*दास्तान भारतीय मुसलमानांची*', प्रकाशन, बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर, २००५, पृ. क्र. ०२.

३८) उक्त — पृ. क्र. ०९.

३९) बाळ प्रकाश व बेडकिहाळ किशोर (संपा.) — '*धर्म, राजकारण, वस्तूस्थिती आणि विपर्यास*', अक्षर प्रकाशन, डॉ. आंबेडकर अकादमी, सातारा, २००३, पृ. क्र. ०९.

४०) प्रा. बेन्नुर एफ. एच. — '*भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता*', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, १९९५, अंक ५ व ६, पृ. क्र.

४१) डॉ. चौसाळकर अशोक — '*भारतीय राष्ट्रवाद : आव्हाने आणि आवाहनें*', लेख शिर्षक — हिंदुत्व की राष्ट्रीत्व, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १९९३, पृ. क्र. २३.

४२) उक्त — पृ. क्र. २४, २५, २७.

४३) मुकादम अ. का. — '*दास्तान भारतीय मुसलमानांची*', प्रकाशन, बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर, २००५, पृ. क्र. ३६, ३७.

४४) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', २२ मार्च १९८९, पृ. क्र. १२.

४५) दलवाई हमीद — '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*' (प्रस्तावनेतून उद्धृत), साधना प्रकाशन, २००२, पृ. क्र. १०.

४६) दलवाई हमीद — 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' (प्रस्तावनेतून उद्धृत), साधना प्रकाशन, २००२, पृ. क्र. १८१.

४७) डॉ. चौसाळकर अशोक — '*भारतीय राष्ट्रवाद : आव्हाने आणि आवाहने*', लेख शिर्षक — हिंदुत्व की राष्ट्रीत्व, इचलकरंजी, १९९३, पृ. क्र. २०.

४८) दलवाई हमीद — '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना प्रकाशन, २००२, पुणे, पृ. क्र. १८२.

४९) उक्त — पृ. क्र. १८०.

५०) डॉ. चौसाळकर अशोक — '*भारतीय राष्ट्रवाद : आव्हाने आणि आवाहने*', लेख शिर्षक — हिंदुत्व की राष्ट्रीत्व, इचलकरंजी, १९९३, पृ. क्र. २२, २३.

५१) दलवाई हमीद — '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना प्रकाशन, २००२, पुणे, पृ. क्र. १८४.

५२) उक्त — पृ. क्र. १८५.

५३) उक्त — पृ. क्र. १८६.

५४) उक्त — पृ. क्र. १८७.

५५) उक्त — पृ. क्र. १९३.

५६) डॉ. चौसाळकर अशोक — '*भारतीय राष्ट्रवाद : आव्हाने आणि आवाहने*', लेख शिर्षक — हिंदुत्व की राष्ट्रीत्व, समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन, १ ऑगस्ट १९९३, पृ. क्र. २७.